MHSN090010862022

# सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.

(पीठासिन अधिकरी श्रीमती डॉ.आर.एस.कुळकर्णी)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १८४/२०२२.**

**निशाणी क्रमांक २९ खालील आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. आनंदराव दत्ताजी शिंदे | **वादी.** |
| | *विरुध्द.* | |
| ०१. | श्रीमती सविता राजेंद्र चव्हाण वगैरे २ | **प्रतिवादी.** |

**(०१).** वादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त कारक ताकिदीसाठी दिलेला आहे. वादी यांचे कथन आहे की, दावा कलम १ अ मधील नमुद वाद मिळकती मौजे आरवडे, ता. तासगांव, जि. सांगली येथील **गट नं. ३०/ड** क्षेत्र ०२ हे. ३० आर याचा सध्याचा नगर भूमापन क्र.५१७ असुन त्यातील दक्षिण बाजूची तासगांव–भिवघाट रोडलगतची अंशतः बांधीव अशंतः खुली अंदाजे ० हे ०२ आर ही मिळकत वाद मिळकत आहे.

**(०२).** पुढे वादी यांचे कथन असे की, सदर वादमिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अनाधिकृत बेकायदेशीर बांधकाम करुन त्यामध्ये रहात असुन सदरचे बेकायदेशीर बांधकाम पाडून दावा मिळकतीचा मालकी हक्काने प्रत्यक्ष कब्जा वादी

यांना मिळण्याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दावा मिळकतीच्या आसपासचा संपूर्ण परीसराचा कायदेशीर कब्जा वादी यांनी वाटपाच्या दाव्याकामी झालेल्या हुकूमनाम्याच्या आधारे यापुर्वीच तहसिलदार तासगांव यांचेकडून कब्जेपट्टीने घेतलेला आहे व त्याच वेळी वाद मिळकतीचा कब्जा वादी यांना देणेचा होता. परंतू, दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्षात घरजागा असल्याने व त्याचा कब्जा देणेबाबत हुकूमनाम्यामध्ये तसा आदेश नसल्याने मे. तहसिलदार यांनी दावा मिळकतीचा केवळ लाक्षणीक कब्जा दिलेला आहे.

**(०३).** वादी यांचे पुढे कथन असे की, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना, म्हणजेच सप्टेंबर–२०२३ मध्ये त्यांनी दावा मिळकती नजीकच्या त्यांच्या मालकीच्या खुल्या जागेमध्ये व्यवसायासाठी पत्र्याचे खोके उभे करण्याचे काम सुरु केले. सदर काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असताना, प्रतिवादीने वादीस सदरचे खोके क्रेन व काही मजूराकरवी उचकटून टाकण्याची धमकी दिली. वादी हे कोल्हापूर येथे राहणारे असल्याने व वयोवृध्द असल्याने त्यांना वेळोवेळी दावा मिळकतीच्या ठिकाणी येणे शक्य नसल्याने त्यांनी श्री. सुनील शहाजी चव्हाण–पाटील यांची इस्टेंट मॅनेजर म्हणून नियुक्ती केली. प्रतिवादीने त्यांना देखील सदर खोके काढून टाकण्याची धमकी दिली.

**(०४).** वादी यांचे पुढे कथन असे की, वादी यांनी प्रतिवादी व इतरांच्या विरुध्द नि.दि.दावा क्र. १५६/१९७८ हा वाटपासाठी व

कब्जेसाठी दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दिनांक २७/०८/१९९१ रोजी होवुन त्यामधील हुकूमनाम्याच्या आधारे मे. तहसिलदार, तासगांव यांचेमार्फत् वाद मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा दिनांक १५/०४/२०१७ रोजी मिळालेला आहे. वादीस अन्य कोणतेही उपजिवीकेचे साधन नसल्याने वादी हे स्वतःच्या मालकीच्या जागेत पत्र्याचे शेड उभे करुन व्यवसाय करुन उपजिवीका करण्याच्या विचारात असताना, प्रतिवादीने सदरचे शेड उचकटून टाकले आहे.

**(०५).** वादी यांचे पुढे कथन असे की, वादी यांनी ज्या जागेत पत्र्याचे खोके उभे केले आहे त्या जागेशी प्रतिवादीचा कोणताही हक्क व हितसंबंध नसताना प्रतिवादी हीने सदरचे पत्र्याचे खोके खुल्या जागेतून उचकटून फेकून दिले आहे. त्यामुळे वादीचे सुमारे ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे सदरचे खोके प्रतिवादीने पुर्वस्थितीत खुल्या जागेत ठेवणेबाबत आदेश करणेबाबत विनंती केली आहे. तसा आदेश होवुनही प्रतिवादीने ते पूर्वस्थितीत ठेवण्यास टाळाटाळ केल्यास प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त कारक ताकीद देण्याची विनंती केली आहे.

**(०६).** प्रस्तुतकामी यातील प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ३५ कडे त्याचे म्हणणे व कैफियत दाखल करुन वादीचे अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांचे कथन असे की, वादीचा अर्ज मुदतीत नाही. वादीने दाव्याचे कामी आवश्यक त्या पक्षकारांना दाव्यात सामील केलेले नाही. दावा मिळकतीच्या चतुःसीमा व वर्णन बरोबर दिलेले नाही. मुळ दावा हा

तहसिलदार यांनी दिलेल्या कब्जेपट्टीवर आधारीत आहे. परंतू, सदर निर्णय मा. जिल्हाधिकारी यांनी आर.टी.एस. अपील क्र. १८४/२०१७ मध्ये रद्द केला आहे. त्यामुळे सदर दाव्यास आदेश ७ नियम ११ ची बाधा येते.

**(०७).** पूढे प्रतिवादी यांचे कथन असे की, वादी यांचा मालकी हक्क मुळातच दिनांक १६/०२/२००५ रोजी वादी यांनी श्री. विठ्ठल गोविंद चव्हाण यांना नोंदणीकृत खरेदीदस्ताने विक्री करुन ताबा दिलेला आहे. तद्ननंतर श्री. विठ्ठल चव्हाण यांनी सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ यांचे पती व प्रतिवादी क्र. २ चे वडील श्री. राजेंद्र तानाजी चव्हाण व त्यांचे भाऊ श्री. भागवत तानाजी चव्हाण यांना दिनांक ३०/०३/२००५ रोजी रितसर खरेदीपत्राने हस्तांतरीत केली आहे. तद्नंतर वादीने जाणीवपूर्णक सन २०२२ मध्ये प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादीने जाणीवपुर्वक दाव्यामध्ये दिनांक १६/०२/२००५ रोजी श्री. विठ्ठल गोविंद् चव्हाण यांचे नावे केलेल्या खरेदीपत्राचा उल्लेख टाळला आहे तसेच प्रतिवादी क्र. १ यांचे पती कै. राजेंद्र चव्हाण व श्री. भागवत चव्हाण यांचे खरेदीपत्र दिनांक ३०/०३/२००५ रोजी झाले असुन सदर खरेदीखतास वादीने संमतीवजा साक्ष म्हणून सही केली आहे. त्यामुळे मुळातः वादी यांचा वादमिळकतीतील हक्क नष्ट झालेला आहे. वादीने जाणीवपुर्वक सदर दोन्ही खरेदीखतांचा उल्लेख दाव्यात करण्याचे टाळलेले आहे. वादी यांनी सदर दोन्ही खरेदीखते रद्द करुन मागितलेली नाहीत. त्यामुळे वादी यांचा दिनांक १६/०२/२००५ रोजीच सदर खरेदीपत्रानुसार वाद मिळकतीतील मालकी हक्क व कब्जा नष्ट

झालेला आहे. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही. वादीने केवळ प्रतिवादीस त्रास देण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा दावा दाखल केला असुन वादीचा अर्ज नामंजूर करावा व प्रतिवादीकडून नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये २५,०००/– मिळण्याची विनंती केली आहे.

**(०८).** प्रस्तुत कामी वादी यांनी खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | नि.क्र. |
|---|---|---|
| **०१.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील खाते नं. १२०४ चा उतारा. | **०८.** |
| **०२.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील खाते नं. ७६२ चा उतारा. | **०९.** |
| **०३.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील गट नं. ३९१ चा ७/१२ उतारा. | **१०.** |
| **०४.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील गट नं. ३९४ चा ७/१२ उतारा. | **११.** |
| **०५.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील गट नं. ४७२ चा ७/१२ उतारा. | **१२.** |
| **०६.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील ग्रामपंचायत मिळकत नं. २७४ चा मालमत्ता क्रं. २२२/५ चा उतारा. | **१३.** |
| **०७.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील ग्रामपंचायत मिळकत नं. २७६ चा मालमत्ता क्रं. २२२/७ चा उतारा. | **१४.** |
| **०८.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील ग्रामपंचायत मिळकत नं. ७५१ चा मालमत्ता क्रं. ६१३ चा उतारा. | **१५.** |

| | | |
|---|---|---|
| **०९.** | मौजे दहिवडी ता. तासगांव येथील फेरफार नं. २५३१ चा उतारा. | **१६.** |
| **१०.** | तासगांव येथील रे.दि.मु.नं. १५६/१९७८ ची नि.क्र. १ ची सहिशिक्क्याची नक्कल | **१९.** |
| **११.** | तासगांव येथील रे.दि.मु.नं. १५६/१९७८ ची निकालाची सहिशिक्क्याची नक्कल | **२०.** |
| **१२.** | तासगांव येथील रे.दि.मु.नं. १५६/१९७८ ची हुकूमनाम्या ची सहिशिक्क्याची नक्कल | **२१.** |
| **१३.** | तासगांव येथील रे.द.नं. २८/१९९२ ची नि.क्र. १ ची सहिशिक्क्याची नक्कल | **२२.** |
| **१४.** | मे. तहसलिदार, तासगांव यांचेकडील क्र.वाटप/एसआर/१४२/२०१३ चे संपूर्ण कागदापत्र | **२३.** |

(०९). प्रस्तुत कामी प्रतिवादी यांनी खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **नि.क्र.** |
|---|---|---|
| **०१.** | दिनांक ३०/०३/२००५ रोजीचे मुळ खरेदीखत | **३४/१.** |
| **०२.** | दिनांक ०५/१२/२००६ रोजीचे मुळ खरेदीखत | **३४/२.** |
| **०३.** | दिनांक १२/१२/२००८ रोजीचे खरेदीखताची झेरॉक्सप्रत | **४१/१.** |
| **०४.** | तासगावं येथील रे.दि.मु.नं. ५५/२०२२ ची नि.क्र.१ ची झेरॉक्सप्रत. | **४१/२.** |

(१०). वादीचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपुर्ण कागदपत्राची पडताळणी केली. त्यावरून प्रस्तुतचा अर्ज निर्णित करणे हेतु माझे समोर

खालील वादप्रश्न उपस्थितीत होतात. त्यावरील कारणमिमांसा व निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादी सकृतदर्शनी खटला असल्यांचे शाबीत करतात काय ? | **नाही.** |
| ०२ | न्यायाचा तौलनीक कल वादीच्या बाजुने आहे काय ? | **नाही.** |
| ०३ | प्रस्तुत अर्ज नाकारल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| ०४ | आदेश काय ? | **अर्ज नामंजूर करणेत आला.** |

## कारणमिमांसा

### वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ करिता.

**(११).** सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणेहेतु एकत्रीत विचारात घेतले आहेत. वादीचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत कामी वादीने यातील प्रतिवादी यांचेविरुध्द मालकी हक्कावरुन कब्जेसाठी व कारक ताकिदीकरीता दाखल केला आहे. याकामी वादीने नि.क्र. १० कडे दाखल केलेला मिळकतीचा ७/१२ उतारा पाहता त्यावर वादीचे नाव असल्याचे दिसुन येते. तसेच वादीने नि.क्र. १९ कडे दाखल केलेली नियमित दिवाणी दावा क्र. १५६/१९७८ ची नि.क्र. १

ची नक्कल पाहता त्यामध्ये वादीने सदरचा दावा हा या दाव्यातील वाद मिळकतीचे वाटप होवुन मिळणेकरीता दाखल केला असल्याचे दिसुन येते. तसेच नि.क्र. २० कडील सदर दाव्याच्या निकालाची प्रत पाहता त्यामध्ये सदर दाव्याचा निकाल दिनांक २७/०३/१९९१ रोजी झाला असुन त्यामध्ये मे. न्यायालयाने वादी व त्याचे वडीलांचे इतर वारसामध्ये वादमिळकत गट नं. ३० मध्ये १/२ हिस्सा असल्याचे जाहीर केले आहे. तसेच नि.क्र. २२ कडील रे.द. क्र. २८/१९९२ मधील नि.क्र. १ व त्यावरील आदेश दिनांक १३/०७/२०१० रोजीचा आदेश पाहता त्यामध्ये वादीने त्याचा हिस्सा विक्री केला असल्याने त्याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत तहसिलदार यांनी विनंती केली असल्याचे नमुद केले आहे. तसेच नि.क्र. २३ कडील तहसिलदार यांचेकडील वाटप क्र.१४२/२०१३ चा निकाल दिनांक १८/०१/२०१७ रोजी झाला असुन वाद मिळकतीचे वाटप करुन कब्जा दिला असल्याचे सदर निकालावरुन दिसुन येते. याउलट नि.क्र. ३१/०१ कडील दिनांक ३०/०३/२००५ रोजीचे खरेदी खतपाहता त्यामध्ये लिहुन देणार विठ्ठल गोविंद चव्हाण यांनी सदरची मिळकत वादी यांचेकडून दिनांक १६/०२/२००५ रोजी खरेदी केली असल्याचे कथन केले आहे. व सदर वादमिळकतीमधील आठ आणे हिस्सा त्यांनी प्रतिवादी क्र. १ चे पती व दीर यांना विक्री केली असुन सदर दस्तास साक्षीदार क्र. १ म्हणून वादी यांनी सही केली आहे. यावरुन वादी याने रे.दि.मु.नं. १५६/१९७८ मधील न्यायनिर्णयानुसार वादमिळकतीतील त्याचा असणारा हिस्सा अंतिम हुकूमनामा होणेपुर्वी विक्री केला असल्याचे दिसुन येते. तसेच

नि.क्र. ३१/०१ कडील दिनांक ३०/०३/२००५ रोजीचे खरेदी खतपाहता सदर खरेदी खतास साक्षीदार क्र. १ म्हणून वादी यांचे नाव नमुद आहे. यावरुन सदर व्यवहाराबाबत वादीस माहिती व कल्पना होती. असे असताना वादीने सदर खरेदी खतास कोणतीही हरकत घेतली नसल्याचे दिसुन येते. तसेच सदरचे खरेदी खत रद्द करुन मागितले बाबतचे कथन केले नाही. यावरुन वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात दाद मागणेकरीता आलेला नसल्याचे दिसुन येते. वादी केवळ वाद मिळकतीच्या ७/१२ उता-यावरील असलेल्या नावाचा गैरफायदा घेवुन वाद मिळकतीमध्ये त्याचा नसलेला हक्क नव्याने पुर्नस्थापित करु पहात असल्याचे दिसुन येते. या सर्व तथ्यांचा विचार करता **वादीस सकृतदर्शनी खटला नाही, न्यायाचा तौलनिक कल वादीचे बाजुने नाही, तसेच हा अर्ज नांमजुर झालेस वादीचे पैशाने न भरून येणारे नुकसान** होत नाही या अनुमानास मी आले आहे. सबब मी **वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ तद्‌अनुषंगाने उत्तरी** करीत आहे.

## आदेश.

**०१.** वादीचा नि.२९ वरील तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजुर करणेत आला.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करणेत येतो.

Sd/xxx

(डॉ.आर.एस.कुळकर्णी)
सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
तासगांव.

तासगांव.
दिनांक : ११ जानेवारी २०२४.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | ११ जानेवारी २०२४. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | ११ जानेवारी २०२४. |
| आदेश अपलोड दिनांक | – | ११ जानेवारी २०२४. |